पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - ७५**

**सभावृत्तांत**

दिनांक - २७/०८/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २७/०८/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.जगदिश शेट्टी
८) मा.भालेकर अरुणा दिलीप
९) मा.वाघेरे सुनिता राजेश
१०) मा.महेशदादा किसन लांडगे
११) मा.बारणे माया संतोष
१२) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१३) मा. लोंढे गणेश नारायण
१४) मा.कदम सदगुरु महादेव
१५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१६) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.खांडकेकर,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.माछरे – सहा.आयुक्त,मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे – सह शहर अभियंता,मा.भोसले –मुख्यलेखापाल, मा.भोसले - मुख्यलेखापाल , मा.डॉ.मनोज देशमुख –प्र. वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.दुधेकर,मा.ढगे, मा.निकम,मा.सवणे, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव,मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.कपिले,मा.थोरात,मा.साळवी,मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.सय्यद, मा.बरशेट्टी,मा.जुंधारे -

कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.उबाळे- प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक,मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी,मा.पोमण – संगणक अधिकारी,मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी,मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**-------**

<u>**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**</u>

विषय क्र. २८) प्रभाग क्र. ५१ येथील कांतीलाल खीवसरा हॉस्पीटलमधील रुग्णांसाठी स्नॅक सेंटर चालु करणेबाबत..मा.सुनिता वाघेरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २९) अ मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.संगिता भोंडवे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३०) प्रभाग क्र.१४ मध्ये वाहतुकनगरीमध्ये पार्किंग प्लॉटमध्ये सुधारणा करणेबाबत.

विषय क्र. ३१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थीक वर्षामध्ये तरतुद वर्गीकरण करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३२) सन २०१३ – १४ वे अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट मंजुर करणेबाबत..मा.संगिता भोंडवे,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३३) महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकामध्ये भोसरी गावठाण येथील कामांसाठी तरतुद वर्गीकरण करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३४) सारथी या मराठी माहिती पुस्तीकेचे हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये अनुवाद करणेबाबत..

विषय क्र. ३५) अंदाजपत्रकात वाढ घट करणेबाबत..मा.संगिता भोंडवे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) ठराव क्र.१५४४१ मध्ये दुरुस्ती करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.३८) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) अ प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४०) ब प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्यविषयक विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४३) अ प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्यविषयक विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) अ प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्यविषयक विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेकामी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.४६) महसुल तरतुद वर्ग करणेबाबत.

------------

ठराव क्रमांक – ३९४१ | विषय क्रमांक – १
दिनांक – २७/८/२०१३ | विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.अविनाश टेकावडे | अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/६/कावि/७२४/२०१३दि.१३/८/२०१३

विषय :- निविदा नोटीस क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.४२ वरील कामाचा करारनामा करणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४२ | विषय क्रमांक – २
दिनांक – २७/८/२०१३ | विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.शकुंतला धराडे | अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. पापु/६/कावि/७३९/२०१३दि.१६/८/२०१३

विषय :- निविदा नोटीस क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.३२ वरील कामाचा करारनामा करणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४३ विषय क्रमांक – ३
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – पर्यावरण अभियांत्रीकी
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पअक/१/कावि/२४६/२०१३दि.१६/८/२०१३
विषय :- मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४४ विषय क्रमांक – ४
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्था/बीआरटीएस/५८१/२०१३दि.१६/८/२०१३
विषय :- जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरु असलेल्या SUTP प्रकल्पाबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४५ विषय क्रमांक – ५
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/नि/३/कावि/१७९/२०१३दि.१६/८/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, वार्ड क्र.२१ स.नं.१ येथिल प्रेक्षागृह देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणेकामी मे.सुरज कॉन्ट्राक्टर (नि.र.रु.१८,६७,४२४/- (अक्षरी र.रु.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे चोविस) पेक्षा २२.०८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१५,२७,८५२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४६ विषय क्रमांक – ६
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.बप्र/स्था/काअ/२/४४/२०१३दि.७/८/२०१३

चिंचवड प्रभाग क्र.२१ मध्ये भोईरनगर येथे “महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०१३” साठी मंडप व्यवस्था करणे, कामाची तातडीची गरज व आवश्यकता लक्षात घेता मे.सिध्दी एंटरप्राईजेस यांचेकडून निविदा न मागविता थेट पध्दतीने करारनामा न करता काम करुन घेतले असल्याने सदर कामास व त्यासाठी येणा-या र.रु.१,००,७७०/- (अक्षरी रु.एक लाख सातशे सत्तर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४७ विषय क्रमांक –७
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.वि/मुका/४/कावि/४५१/२०१३दि.१६/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/१२-१३ मधिल अ.क्र.६ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील वीज उपकेंद्रातील रोहित्रसंचाची व ब्रेकर्सची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु. १८,५५,३७७/- (अक्षरी र.रु.अठरा लाख पंचावन्न हजार तीनशे सत्याहत्तर) पेक्षा १२.६० % कमी) या ठेकेदाराकडुन वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४८ विषय क्रमांक – ८
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.वि/मुका/४/कावि/४५२/२०१३दि.१६/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, मनपाच्या अ व क प्रभागांतर्गत येणा-या शुध्द पाणीपुरवठा पंपींग स्टेशन मधील सबस्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एम.बी.इलेक्ट्रीक & कंपनी (नि.र.रु.२१,८४,८०७/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख चौ-याऐंशी हजार आठशे सात) पेक्षा २७.९० % कमी) या ठेकेदाराकडुन वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९४९ विषय क्रमांक – ९

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/८/कावि/४००/२०१३दि.१६/८/२०१३

विषय :- तरतुद वर्ग करणेबाबत.

विषय क्रमांक ९ चा विचार दि.१७/०९/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५० विषय क्रमांक – १०

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/७३८/२०१३दि.१६/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे आरोग्य वैद्यकीय विभागाकडील मध्यवर्ती साहित्य भांडारास डेंग्यु/मलेरीया विषयक जनजागृती प्रसिध्दी आवाहन पत्रके मे. आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडुन कोटेशन नोटीस सुचना क्र.08/2013-14 नुसार छपाई करणेस व त्याकामी येणा-या र.रु.33,330/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५१ विषय क्रमांक – ११

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – वायसीएमएच विद्युत

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वि/वायसीएमएच/मुपुर/२/७/२०१३
दि.१७/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील ५०० KVA क्षमतेच्या जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे उत्पादित कंपनीची अधिकृत सेवा देणारी एजन्सी मे. एम. के. सर्विसेस, पुणे १५ यांचे कडून दि. १/०८/२०१३ ते दि. ३१/०७/२०१५ या कालावधीकरीता करारनामा न करता करवून घेणेस व त्याकामी AMC चार्जेस सर्व करांसह र.रु.१,०६,०६८/- इतकी रक्कम वर्षनिहाय आगाऊ अदा करणेस व प्रत्यक्ष देखभाल दुरुस्तीच्या वेळी लागणा-या सुट्या साहित्यापोटी येणारा प्रत्यक्ष खर्च त्या त्या वेळी वेगळा अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५२ विषय क्रमांक – १२

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/७४१/२०१३दि.१७/८/२०१३

विषय :- निविदा नोटीस क्र.१/१३ – २०१२/१३ चे कामाचा करारनामा करुन घेणेत आला असुन त्याचे अवलोकन करणेबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५३ विषय क्रमांक – १३

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/५/कावि/६२६/२०१३दि.१७/८/२०१३

विषय – नागरी सुविधा केंद्रा करीता संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत.

विषय क्रमांक १३ चा विचार दिनांक १७/०९/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५४ विषय क्रमांक – १४

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४३/२०१३दि.१७/८/२०१३

विषय :- निगडी आकुर्डी बस टर्मिनलच्या परिसरात नागरिकांना प्रवाशांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५५ विषय क्रमांक – १५

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४२/२०१३दि.१७/८/२०१३

विषय :- पी.एम.टी.चौक भोसरी व सदगुरु नगर भोसरी,इंद्रायणीनगर,नेहरुनगर बस टर्मिनलच्या परिसरात नागरिकांना प्रवाशांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५६ विषय क्रमांक – १६

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/वा.क/कावि/४४/२०१३दि.१७/८/२०१३

विषय :- सांगवी पिंपळेगुरव पिंपळेनिलख पिंपरी बस टर्मिनलच्या परिसरात नागरिकांना प्रवाशांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५७ विषय क्रमांक – १७

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – वाहनदुरुस्ती कार्यशाळा

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.काशा/भां/कावि/३११/२०१३दि.१९/८/२०१३

विषय :- मनपा कडील वाहनांचे जुने टायर रिमोल्डींग करुन घेणेकामी एजन्सी निश्चीत करणेबाबत..

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५८ विषय क्रमांक – १८

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – वाहनदुरुस्ती कार्यशाळा

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा. क्र. काशा/भां/कावि/३१०/२०१३दि.१९/८/२०१३

विषय :- मनपाकडील वाहनांच्या लिलावाकामी लिलावदार व लिलाव कमिशन एजन्सीचे दर निश्चीत करणेबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९५९ विषय क्रमांक – १९

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४८/२०१३दि.२०/८/२०१३

विषय :- हॅरिस पुल दापोडी मेगा मार्ट सी.एम.ई दापोडी जकात नाका फुगेवाडी कासारवाडी रेल्वे गेट सागर प्लाझा व इतर पार्किंगची विकसीत कामे करणेबाबत..

विषय क्रमांक १९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६०  विषय क्रमांक – २०
दिनांक – २७/८/२०१३  विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.महेशदादा लांडगे  अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४५/२०१३दि.२०/८/२०१३
विषय :- म्हाळसाकांत चौक ते आकुर्डी रेल्वे स्टेशन पर्यंत पादचारी मार्ग व नागरिकांना सुरक्षीत रस्ता ओलांडण्याच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६१  विषय क्रमांक – २१
दिनांक – २७/८/२०१३  विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.अविनाश टेकावडे  अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४९/२०१३दि.२०/८/२०१३
विषय – चाफेकर चौक ते लगतच्या रस्त्यावरील पादचारी मार्ग व नागरीकांना सुरक्षीत रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६२  विषय क्रमांक – २२
दिनांक – २७/८/२०१३  विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.विनया तापकीर  अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४७/२०१३दि.२०/८/२०१३
विषय – परशुराम चौक ते रामनगर सी.डी.वर्क ते बसवेश्वर टेल्को रस्ता ते एच.डी.एफ.सी कॉलनी रस्ता बालाजी हॉटेल ते महाबली व इतर रस्ते येथे वाहतुक सुधारणा विषयक कामे करणेबाबत..

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६३  विषय क्रमांक – २३
दिनांक – २७/८/२०१३  विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.अविनाश टेकावडे  अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/४६/२०१३दि.२०/८/२०१३
विषय – क प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील हॉस्पीटल परिसरात नागरिकांना सुरक्षीत

रस्ता ओलांडण्याच्या सुविधा तयार करणेबाबत..

विषय क्रमांक २३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६४ विषय क्रमांक – २४

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/नि/२ब/कावि/३६५/२०१३दि.२०/८/२०१३

विषय – वॉर्ड क्र.६२ सावरकर उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणेबाबत..

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६५ विषय क्रमांक – २५

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – ब मुख्यालय

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्था/बमु/५५/२०१३दि.२५/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

म.न.पा.च्या मुख्य प्रशासकिय इमारतीमध्ये नुतनीकरण करणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकीय र.रू.४९,९९,७४७/- (वाढीव अंदाजपत्रकीय र.रू.२१,९९,२०६/-) (अक्षरी र.रू. एकवीस लाख नव्यान्नव हजार दोनशे सहा फक्त) चे पूर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६६ विषय क्रमांक – २६

दिनांक – २७/८/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.प्रशा/३/कावि/६९१/२०१३दि.१९/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

श्री.सुनिल रामू धोत्रे, सफाई कामगार याची एक वेतनवाढ स्थगित ठेवुन त्यांस कामावर घेणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६७ विषय क्रमांक – २७
दिनांक – २७/८/२०१३ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/आ१/६७३/२०१३दि.२२/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीची विकास योजना प्रकरणी तळवडे, त्रिवेणीनगर चौक येथील ५२ ते ६० मी रूंद रस्त्याचे प्रथम टप्प्यात भूसंपादन करणेबाबत जाहिर नोटीस मा. आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि. २०/६/२०१३ अन्वये जनता संपर्क विभागाकडील जाहिरात क्र.५८ नुसार दै इंडियन एक्सप्रेस व दै लोकमत या वृत्तपत्रात दि. २४/६/२०१३ नुसार प्रसिध्द करणेत आली. त्यास अनुसरून दै इंडियन एक्सप्रेस व दै लोकमत या वृत्तपत्रांनी खालीलप्रमाणे बिल सादर केले असून सदरची रक्कम उपरोक्त वृत्तपत्रास अदा करणे आवश्यक असलेने दै इंडियन एक्सप्रेस व दै लोकमत यांना अदा करावयाच्या र.रू. १,०७,१३६/- (अक्षरी र.रू. एक लाख सात हजार एकशे छत्तीस फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | माध्यम | साईज चौ.से.मी. | बिल क्रमांक | दिनांक | र.रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दै. इंडियन एक्सप्रेस | इंग्रजी | १८० | १००१५५०९६५ | २६/६/१३ | १०१५२०/- |
| २ | लोकमत | मराठी | १५६ | ७१६६ | २४/६/१३ | ५६१६/- |
| | | | | | एकूण | १०७१३६/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक – ३९६८ विषय क्रमांक – २८
दिनांक – २७/८/२०१३
सुचक – मा. सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भः- मा.सुनिता वाघेरे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.५१ गणेशनगर – बेलठीकानगर या भागात कांतीलाल खीवसरा हॉस्पीटलमधील रुग्णांना चहा – कॉफी,बिस्कीटे इत्यादी जवळपास सुविधा नसल्याने गैरसोय होत आहे. त्यामुळे हॉस्पीटलमध्ये १० x ८ साईजची जागा उपलब्ध असुन तेथे श्री.स्वामी समर्थ स्वयंरोजगार संस्था यांना मनपा नगररचना विभागाच्या अटी शर्ती व जे भाडे आकारतील

त्यानुसार संस्थेस हॉस्पीटलमधील १० x ८ साईजची जागा स्नॅक सेंटर तीन वर्षे कालावधी करीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९६९ विषय क्रमांक – २९

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.संगिता भोंडवे,मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव..

अ मुख्यालयामध्ये सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करावयाचा आहे तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे बदल होणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट १०.५०)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७० विषय क्रमांक – ३०

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/स्था/०१/कावि/१५६९/२०१३दि.२६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ प्रभागातील प्रभाग क्र.१४ वाहतुकनगरीमध्ये पार्किंग प्लॉटमध्ये सुधारणा (pavement quality concrete)आराखडयातील रस्त्यांच्या कामाचे पुर्वगणनपत्रक तयार करणे(Estimate) विविध निविदा पुर्व (pre tender activity)व निविदा पश्चात (post tender activity)बाबींसाठी सल्लागार म्हणुन सी.व्ही.कांड यांची नेमणुक करणे व त्यासाठी महापालिकेच्या विविध प्रकल्पासाठी सल्लागार यांस देण्यात येत असलेल्या प्रचलीत दरानुसार निविदा पुर्व (pre tender activity)कामांसाठी स्वीकृत निविदा किमतीच्या ०.८०% व निविदा पश्चात (post tender activity) कामांसाठी स्वीकृत निविदा किंमतीच्या १.४५ % अधिक सेवाकर (Service tax)अदा करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मनपाच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ६,६०,०००)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा. संगिता भोंडवे अनुमोदक –मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

मनपाचे झोनिपु स्थापत्य विभागाचे सन २०१३ व १४ चे अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ /घट र.रु.३०००००)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक –मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१३- १४ चे अंदाजपत्रकामध्ये भोसरी गावठाण येथील कामासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. व सदरचा ठराव कायम होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करणेत यावी.(वाढ / घट र.रु.१६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक –मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अतिरीक्त आयुक्त यांचे जा.क्र.जसं/६/कावि/५८७/२०१३दि.२७/८/२०१३

मा.अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

महानगरपालिकेच्या कामकाजाबद्दल नागरिकांना अधिक माहिती देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी सारथी मार्गदर्शन पुस्तक तयार केले आहे. ते मराठी भाषेमध्ये असुन त्याचे हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये अनुवादन केल्यास त्याचा जास्तीत जास्त उपयोग मनपा हद्दीतील नागरीकांना होईल. कारण पिंपरी चिंचवड शहराची ओळख ही औद्योगिक नगरीप्रमाणे आय.टी.हब म्हणुनही झाली आहे. सबब,हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये पुस्तीका करणेकामी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ऍण्ड अग्रीकल्चर वतीने मे.सी.एस.आर कन्सल्टंट जनवाणी, पुणे यांनी दि.२२/८/२०१३ चे पत्रान्वये र.रु. १,३५,०००/- एवढा खर्च कळविला असुन सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – २७/८/२०१३
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक –मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

झोनिपु स्थापत्य विभागाचे सोबतचे प्रपत्रात नमुद प्रमाणे अंदाजपत्रकात वाढ घट करणेस मंजुरी देण्यात येत आहे. ( वाढ /घट रुपये ३१.३३ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – २७/८/२०१३
सुचक – मा. सुषमा तनपुरे अनुमोदक –मा. संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

प्रपत्रात नमुद प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये तरतुद वर्ग करणेस मंजुरी देण्यात येत आहे. (वाढ /घट रु. १०,०५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – २७/८/२०१३
सुचक – मा. सुषमा तनपुरे अनुमोदक –मा. संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.१५५४१ दि. १.११.२०११ चे विषयपत्रामध्ये नजर चुकीने निविदा र.रु. ४६,६८,५३४/- चे निविदा मंजुर दर ३.४५% जास्त प्रमाणे रक्कम रु.४८,२९,५९८/- येणे अपेक्षीत होते. त्याऐवजी निविदा रक्कम रु.४६,६८,५३४/- चे ३.४५% कमी रक्कम रु.४५०७४७०/- अधीक ५% वाढ/घट प्रमाणे रक्कम रु. ४७,३२,८४३/- पर्यंत काम करुन घेणेस मंजुरी दिलेली आहे. तरी ठराव क्र.१५,५४१ दि.१.११.२०११ मधील र.रु.४७,३२,८४३/- हा मजकुर वगळुन त्या ऐवजी निविदा रक्कम रु. ४८,२९,५९८/- निविदा दराप्रमाणे काम करुन घेण्यास असा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९७८ विषय क्रमांक – ३८

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा. सुषमा तनपुरे अनुमोदक –मा. संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३ -१४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ७,५०,००,०००/-).

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –३९७९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव...

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील एकूण १० कामांना कमी तरतूद असलेमुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतूद असलेल्या कामांस रक्कम रु.५,१४,८५,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नविन कामामध्ये होणा-या बचतीमधून प्रस्तावासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. अ प्रभागातील सन २०१३-१४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८० विषय क्रमांक –४०

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव...

ब प्रभागातील सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे ब प्रभागाकडील व ब मुख्यालयाकडील वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५४,९०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८१ विषय क्रमांक –४१

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३-१४च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२८,०५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८२ विषय क्रमांक –४२

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव...

ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८३ विषय क्रमांक –४३

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा. संगिता भोंडवे अनुमोदक – मा. सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.संगिता भोंडवे,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील एकुण ६ कामांना कमी तरतुद असल्यामुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. सदर कामांचे financial closer करता येत नाही. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतुद असलेल्या कामांस र.रु. २३,६२,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतुद असलेल्या तसेच नवीन कामामध्ये होणा-या बचती मधुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. तसेच प्राधिकरण से.क्र.२५ मधील ठिकठिकाणचे पाथवेचे डांबरीकरण करणे या कामाचा अंदाजपत्रकात समावेश नसलेमुळे अ प्रभागातील डांबरी रस्ते या “लेखाशीर्षावर” अ प्रभागातील उर्वरीत बिले अदा करणे” या कामाचा समावेश करणेस Dash board Entry करणेस तसेच प्रस्तावासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८४ विषय क्रमांक –४४

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव…

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील मुख्यालयाकडील एकूण २८ व प्रभाग स्तरावरील एकूण ११ कामांना कमी तरतूद असलेमुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतूद असलेल्या कामांस रक्कम रु.१,४३,००,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नविन कामामध्ये होणा-या बचतीमधून प्रस्तावासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. अ प्रभागातील सन २०१३-१४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्यविषयक विकास कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८५ विषय क्रमांक –४५

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा. अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/४/कावि/३८५/२०१३ दि.२६/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाची सारथी हेल्पलाईन दि.१५/०८/१३ रोजी मा. श्री.अजितदादा पवार, उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते सुरु करणेत आली आहे. सदर हेल्पलाईन करीता सध्या सहा महिने करारावर ०८ कॉल सेंटर ऑपरेटर यांच्या नेमणुका करणेत आलेल्या आआआआ. सदर हेल्प लाईनला मिळालेला भरघोस प्रतिसाद विचारात घेता प्रस्तावात नमुद केलेल्या दैनिकामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन सहा महिने करारावर आणखीन “ कॉल सेंटर ऑपरेटर” भरणे बाबतची वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या र.रु.६५,१६०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३९८६ विषय क्रमांक –४६

दिनांक – २७/८/२०१३

सुचक – मा. अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/आस्था/कावि/६६४/२०१३ दि.२२/८/२०१३

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे दूरसंचार विभागाचे स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर आज अखेर र.रु.९१,८२,५६९/- एवढी तरतुद शिल्लक आहे. सदरच्या तरतुदींमधुन र.रु. ७,०८,०००/- एवढी रक्कम "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/८०४/२०१३
दिनांक - ३०/०८/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.